महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ
Maharashtra State Board of Secondary and Higher Secondary Education
नागपूर विभागीय मंडळ, सिव्हिल लाईन्स, नागपूर -440 001
e-mail :-msboardnagpur@gmail.com www.nagpureduboard.in

पत्र क्र. नाविमं/उमागो/प्रात्यक्षिक/३७५४
नागपूर, दि.२४/१२/२०२४

प्रति,
प्राचार्य,
सर्व मान्यता प्राप्त कनिष्ठ महाविद्यालय,
सर्व ऑनलाईन परीक्षा केंद्र,
माहिती तंत्रज्ञान व सामान्यज्ञान विषय

विषय :– उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रु/मार्च २०२५ माहिती तंत्रज्ञान (आय.टी) व सामान्यज्ञान (जी.के.) या विषयाच्या ऑनलाईन परीक्षेच्या आयोजनाबाबत

संदर्भ :– राज्य मंडळ,पुणे यांचे पत्र क.रा.मं./ऑनलाईन आय.टी./जी.के./४६०८ दिनांक २९ नोव्हेंबर २०२४

उपरोक्त विषयाचे संदर्भिय पत्राचे अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, फेब्रु/मार्च २०२५ ची उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) लेखी परीक्षा **दिनांक** ११/०२/२०२५ पासून सुरू होत आहे. वेळापत्रकाप्रमाणे माहिती तंत्रज्ञान (आय.टी.) व सामान्यज्ञान(जी.के.) या विषयाची परीक्षा ऑनलाईन पध्दतीने **दिनांक १२/०३/२०२५ ते १८/०३/२०२५** या कालावधीत मध्ये घेण्यात येणार असून प्रत्येक सत्रात (सकाळ व दुपार ) आयोजित करण्यात येणार आहे. प्रत्येक सत्र माहिती तंत्रज्ञान (आय.टी.) विषयासाठी **२** तास **३०** मिनिटे व सामान्यज्ञान (जी.के.) विषयासाठी **२** तास या कालावधीचे राहिल. सदर बाब सूचना फलकावर लावण्यात यावी.

**तंत्रज्ञान (आय.टी.) व सामान्यज्ञान(जी.के.) या विषयाच्या ऑनलाईन परीक्षेचे वेळापत्रक**

| अ क्र | विषयाचे नाव | वार | दिनांक | सत्र |
|---|---|---|---|---|
| १ | माहिती तंत्रज्ञान (आय.टी.) | बुधवार | १२/०३/२०२५ | सकाळी ११.००ते०१.३० व दुपारी०३.००ते०५.३० |
| २ | माहिती तंत्रज्ञान (आय.टी.) | शनिवार | १५/०३/२०२५ | सकाळी ११.००ते०१.३० व दुपारी०३.००ते०५.३० |
| ३ | माहिती तंत्रज्ञान (आय.टी.) | सोमवार | १७/०३/२०२५ | सकाळी ११.००ते०१.३० व दुपारी०३.००ते०५.३० |
| ४ | सामान्यज्ञान (जी.के.) | शनिवार | १५/०३/२०२५ | सकाळी ११.००ते०१.०० व दुपारी०३.००ते०५.०० |
| ५ | सामान्यज्ञान (जी.के.) | सोमवार | १७/०३/२०२५ | सकाळी ११.००ते०१.०० व दुपारी०३.००ते०५.०० |
| ६ | सामान्यज्ञान (जी.के.) | मंगळवार | १८/०३/२०२५ | सकाळी ११.००ते०१.०० व दुपारी०३.००ते०५.०० |

जे विद्यार्थी तांत्रिक व्यत्यय व अन्य कारणामुळे निर्धारित वेळापत्रकानुसार परीक्षा देऊ शकणार नाहीत. त्यांच्यासाठी खास बाब म्हणून सर्व परीक्षा केंद्रावर दिनांक १७/०३/२०२५ रोजी सकाळी ११.०० ते १.३० व दुपारी ०३.०० ते ०५.३० माहीती तंत्रज्ञान आय. टी. आणि दिनांक १८/०३/२०२५ रोजी सकाळी ११.०० ते १.०० व दुपारी ०३.०० ते ०५.०० सामान्यज्ञान जी. के या विषयासाठी पुर्नपरीक्षेची संधी उपलब्ध करून देण्यात येत आहे.

ज्या विद्यार्थ्यांची उपरोक्त कारणास्तव परीक्षा होणार नाही अशा कनिष्ठ महाविद्यालयांनी माहिती तंत्रज्ञान (आय.टी.) या विषयाच्या विद्यार्थ्यांची माहिती दिनांक १७/०३/२०२५ व सामान्यज्ञान (जी.के.) या विषयाच्या विद्यार्थ्यांची माहिती दिनांक १८/०३/२०२५ रोजीच्या दुसऱ्या सत्रापर्यंत विभागीय मंडळ कार्यालयातील विभागीय तांत्रिक समन्वयकांना कळविणे आवश्यक आहे.

**सदर परीक्षेच्या पूर्वतयारीबाबत खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत –**

१. संगणक प्रयोगशाळा व संगणक यंत्रणा परीक्षेसाठी सुसज्ज करण्यात यावी.

२. या परीक्षेसाठी अखंडित विद्युत पुरवठा, इंटरनेट कनेक्टीव्हीटी आवश्यक आहे. या दृष्टीने आपण आपल्या कार्यक्षेत्रात जिल्हा/तालुका स्तरावरील संबंधीत यंत्राणांशी संपर्क साधावा.

३ .पर्यवेक्षणासाठी (माहिती तंत्रज्ञान (आय टी) व सामान्यज्ञान (जी के) विषय न शिकविणाऱ्या व संगणक चालू करण्याचे Basic ज्ञान असलेल्या) इतर विषयाच्या शिक्षकांची नियुक्ती करण्यात यावी.

४.माहिती तंत्रज्ञान (आय टी) व सामान्यज्ञान (जी के) विषय शिकविला जाणाऱ्या प्रत्येक कनिष्ठ महाविद्यालयाची ऑनलाईन तपासणी करून घेण्यात यावी.

५. केंद्रसंचालक, तांत्रिक सहाय्यक व पर्यवेक्षणासाठी नियुक्त केलेल्या शिक्षकांच्या माहितीचा तक्ता दिनांक ३०/१२/२०२४ पर्यंत विभागीय समन्वयकाच्या मेल वर पाठवावा.

६. माहिती तंत्रज्ञान (आय टी) परीक्षेचा कालावधी २.३० तासाचा व सामान्यज्ञान (जी के) विषयाच्या परीक्षेचा कालावधी २.०० तासाचा आहे. यापूर्वी घेतलेल्या या विषयाच्या सर्व सराव परीक्षांचा अनुभव, प्रश्नपत्रिका

आराखडयाचे स्वरूप पाहता सर्वसाधारण पणे १.४५ ते २.तास कालावधी प्रश्नपत्रिका सोडविण्यासाठी पुरेसा असल्याचे आढळून आले आहे. मात्र परीक्षेचे तांत्रिक स्वरूप लक्षात घेता संभाव्य तांत्रिक व्यत्ययाचा विचार करून परीक्षेचा कालावधी २.३० तास व २ तास ठेवण्यात आला आहे. यामुळे विद्युत पुरवठा अर्ध्या तासापर्यन्तच्या कालावधीसाठी खंडित झाला असल्यास, परीक्षेचे पुनर्नियोजन करण्याची आवश्यकता राहणार नाही.

७. ऑनलाईन परीक्षेसाठी कनिष्ठ महाविद्यालयात ६० विद्यार्थी संख्येसाठी १५ संगणकाची आवश्यकता आहे. तरी त्याप्रमाणात संगणकाची पुर्तता करुन घेण्यात यावी.

८. ज्या कनिष्ठ महाविद्यालयात माहिती तंत्रज्ञान व सामान्यज्ञान विषय शिकविण्यात मान्यता दिलेल्या आहे. अशा सर्व कनिष्ठ महाविद्यालयात या विषयाची परीक्षा घेण्यात येईल. माहिती तंत्रज्ञान (आय टी) व सामान्यज्ञान (जी. के.) विषयासाठी कनिष्ठ महाविद्यालय हेच परीक्षा केंद्र राहील. यासाठी विद्यार्थ्यांने लेखी परीक्षेच्या केंद्रावर न जाता आपल्या कनिष्ठ महाविद्यालयात येण्याबाबत विद्यार्थ्यांस सूचना देण्यात याव्यात.

९. अतिरिक्त बैठक क्रमांक / No Candidate / ऐनवेळी विषयात बदल असे विदयार्थी प्रविष्ठ झाल्यास त्यांचे बैठक क्रमांक, कनिष्ठ महाविद्यालयाचा क्रमांक, याची माहिती आय टी तांत्रिक समन्वयकांना त्वरीत कळवावी जेणेकरून त्यांच्या परीक्षेचे नियोजन करता येणे शक्य होईल

१०. परीक्षा कालावधीत परीक्षा सुरू झाल्यानंतर इंटरनेट कनेक्टिव्हीटी मध्ये व्यत्यय आल्यास विद्यार्थ्यानी गोंधळून न जाता प्रश्नपत्रिका सोडविण्याचे काम चालू ठेवावे. कनेक्टिव्हीटी उपलब्ध झाल्यानंतर विद्यार्थ्यानी दरम्यानच्या काळात सोडविलेल्या प्रश्नांची उत्तरे सादर करावी. पेपरची वेळ संपावयाच्या वेळेस कनेक्टीव्हीटी खंडित झाली असेल, तर पेपरची वेळ संपताच विद्यार्थ्यानी दिलेली उत्तरे आपोआप सादर होतील. सबब अशा परिस्थितीत विद्यार्थ्यानी गोंधळून जाण्याची गरज नाही, असे विद्यार्थ्यांना सूचित करावे.

११. दिव्यांग विद्यार्थ्यांना लेखी परीक्षेप्रमाणे २०मिनिटे जादा वेळेची सवलत मान्य राहील. या विद्यार्थ्यांसाठी परीक्षेची वेळ माहिती तंत्रज्ञान (आय टी) या विषयासाठी ३ तास २० मिनिटे व सामान्यज्ञान (जी. के.) या विषयासाठी २ तास ४० मिनिटे राहील. सदर माहिती प्राचार्यानी मंडळास अगोदर कळविणे गरजेचे आहे.

१२. दिव्यांग विद्यार्थी ऐनवेळेवर परीक्षेसाठी आल्यास त्याचे बैठक क्रमांक, कनिष्ठ महाविद्यालयाचा क्रमांक त्वरित विभागीय समन्वयकांना कळवावे जेणेकरुन त्यांच्या परीक्षेचे नियोजन करता येणे शक्य होईल व अशा प्रकरणी विद्यार्थ्याकडून आवश्यक प्रमाणपत्र प्राप्त करून विभागीय मंडळास सादर करावे.

१३. सर्वसाधारण परीक्षेमध्ये विद्यार्थ्यांना ज्या कारण्यासाठी गैरमार्गाचा अवलंब करण्याबदल शिक्षा बजावली जाते ती कारणे व शिक्षेची तरतूद ऑनलाईन परीक्षेसाठी लागू राहील. लेखी परीक्षेप्रमाणे विद्यार्थ्याना अतिरिक्त साहित्य तसेच मोबाईल ,पेजर, कॅलक्युलेटर इत्यादी तत्सम इलेक्ट्रॉनिक्स वस्तू परीक्षेच्या वेळी जवळ बाळगता येणार नाही.

१४. तांत्रिक सहाय्यकांनी परीक्षा केंद्रावर उपस्थित असले, तरी त्यांनी विद्यार्थ्यांना कोणत्याही प्रकारची मदत करावयाची नसून प्रयोगशाळेत पर्यवेक्षकांनी बोलाविल्याशिवाय जावयाचे नाही.

१५. संबधीत व्यक्तीना द्यावयाचे मानधन दर खालीलप्रमाणे असून त्याप्रमाणे त्यांना मानधन देण्याची व्यवस्था करावी.

१. केंद्रसंचालक प्रति सत्र रू. ५०/— एकवट मोबदला रू. १६५/—
( Remuneration Bill Form भरावा.)

२ पर्यवेक्षक :— प्रति सत्र रू. ३०/— पर्यवेक्षक स्थानिक असल्यास रू. ५०/— स्थानिक प्रवास भत्ता अदा करावा. पर्यवेक्षक बाहेरगांवचे असल्यास ( Bill Of Traveling Allowance Form भरावा.)

३. तांत्रिक सहाय्यक :— प्रति सत्र रू. ३०/— (दोन्ही सत्रासाठी उपस्थिती आवश्यक)
( Remuneration Bill Form भरावा.)

४. उपरोक्त केंद्र खर्चाची एकत्रित माहिती ( Abstract Of Remuneration Expenditure Form भरावा.)

वरील सर्व बिलाचे फॉर्म व्यवस्थित भरून सादर करावेत उपरोक्त प्रमाणे कार्यवाही करावी.

टिप:—माहिती तंत्रज्ञान व सामान्यज्ञान या विषयाची ऑनलाईन पुर्नपरीक्षा (Reschedule) ही मंडळातर्फे उद्‌भवणा—या तांत्रिक कारणासाठी घेण्यात येते. संस्था पातळीवर येणाऱ्या अडचणीसाठी घेण्यात येत नाही, यांची नोंद घ्यावी. परीक्षा काळात वीजपुरवठा,दुरध्वनी, व इंटरनेट पुरवठाअव्याहतपणे चालू ठेवण्याकरीता कनिष्ठ महाविद्यालयाने/संस्थेने स्थानिक पातळीवर व्यवस्था करावी. परीक्षा वेळापत्रका प्रमाणेच होतील, यांची नोंद घ्यावी.

(चिंतामण वंजारी)
विभागीय सचिव,
नागपूर विभागीय मंडळ,नागपूर

प्रतिलिपी,

१ सचिव,राज्य मंडळ, भांबुर्डा शिवाजी नगर,,पुणे यांना माहितीस्वत समादराने अग्रेषित.

२ शिक्षण उपसंचालक यांना माहितीस्वत समादराने अग्रेषित.

३ शिक्षणाधिकारी (माध्य.)जिल्हा परिषद, भंडारा,चंद्रपूर,नागपूर,वर्धा,गडचिरोली,गोदिया यांना आवश्यक कार्यवाहीस्तव.

माहिती व तंत्रज्ञान आणि सामान्य ज्ञान या विषयाच्या होणाऱ्या ऑनलाईन परीक्षेकरीता केंद्रावर उपस्थित राहणाऱ्या शिक्षकांची माहिती विभागीय मुख्य समन्वयक श्री राऊळवार यांचे nitinraulwar.onlineexam@gmail.com या संकेतस्थळावर खालील पॅनल (Format) मध्ये प्राचार्य यांचे सही व कनिष्ठ महाविद्यालयाच्या शिक्क्यासह पाठवावी

## महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,

## नागपूर विभागीय मंडळ, नागपूर

| कनिष्ठ महाविद्यालयाचा सांकेतिक क्रमांक | | | प्राचार्य भ्रमणध्वनी क्रमांक | | |
|---|---|---|---|---|---|
| अनु. क्र. | केंद्र संचालकाचे नाव | भ्रमणध्वनी क्रमांक | शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता | विषय | अध्यापनाचा अनुभव |
| १ | | | | | |
| | | | | | |
| अनु. क्र. | तांत्रिक सहाय्यकाचे नाव<br>**IT Teachers** | भ्रमणध्वनी क्रमांक | शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता | विषय | अध्यापनाचा अनुभव |
| १ | | | | | |
| २ | | | | | |
| ३ | | | | | |
| अनु. क्र. | पर्यवेक्षकाचे नाव<br>**Other than I.T. Teacher** | भ्रमणध्वनी क्रमांक | शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता | विषय | अध्यापनाचा अनुभव |
| १ | | | | | |
| २ | | | | | |
| ३ | | | | | |

प्राचार्य

सही, नाव व कनिष्ठ महाविद्यालयाचा शिक्का